राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत कंम्पोनंट डी करिता केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेला निधी राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पाच्या बँक खात्यात जमा करण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
(आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन)
शासन निर्णय क्रमांक : आव्यप्र २०१९/प्र.क्र.२३९/आव्यप्र-१
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- ११.९.२०१९.

वाचा :- गृह मंत्रालय, भारत सरकार यांचे आदेश क्रमांक ४-१/२०१५-PMU (VOl.III)/७४३- ५०, दिनांक २४.७.२०१९ .

प्रस्तावना :-

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्प राज्याच्या किनारी जिल्हयात राबविण्यात येत आहे. या साठी केन्द्र शासन, जागतिक बँक, महाराष्ट्र शासन यांच्यात दिनांक ११.८.२०१५ रोजी करार करण्यात आला आहे. गृह मंत्रालय, भारत सरकार यांच्या दिनांक २४.७.२०१९ च्या आदेशान्वये प्रकल्पांतर्गत कंपोनंट डी करिता सन २०१९-२० करिता पहिला हप्त्यापोटी रु. ४.९१ कोटी एवढा निधी राज्यास वितरीत करण्यात आला आहे. सदर निधी राज्याच्या एकत्रित निधीत जमा झाला आहे.

केन्द्र शासन तसेच राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाच्या मार्गदर्शक सूचना आणि जागतिक बँकेच्या फायनान्शिअल ॲण्ड ऑपरेशनल मॅन्यूअलनुसार केन्द्र शासनाकडून या प्रकल्पाच्या कंपोनंट डी अंतर्गत राज्यास प्राप्त होणारा निधी राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करणे आवश्यक आहे. केन्द्र शासनाकडून प्राप्त झालेला आणि राज्याच्या एकत्रित निधीत जमा झालेला निधी वितरीत करण्यास वित्त विभागाने मान्यता दिल्याने सदर निधी कोषागारातून आहरित करुन राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पांतर्गत केन्द्र शासनाकडून कंपोनंट डी करिता सन २०१९-२० करिता पहिल्या हप्त्यापोटी राज्यास प्राप्त झालेल्या रु. ४.९१ कोटी (रुपये चार कोटी एक्यान्नव लाख फक्त) एवढा निधी आहरित करुन राष्ट्रीय चक्रीवादळ धोके निवारण प्रकल्पासाठी उघडण्यात आलेल्या स्वतंत्र बँक खात्यात जमा करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

सदर निधी आहरित करण्यासाठी श्रीमती खोत, लेखाधिकारी आणि श्रीमती राजश्री राऊत, वित्तीय सल्लागर व सह सचिव यांना अनुक्रमे आहरण व संवितरण अधिकारी आणि नियंत्रक अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

या कामी होणारा खर्च मागणी क्रमांक सी-६, २२४५ नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य १०२ आपत्ती प्रवण क्षेत्रामध्ये नैसर्गिक आपत्कालीन परिस्थितीबाबतच्या तातडीच्या योजनांचे व्यवस्थापन करणे (०८) प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रकल्प अंमलबजावणी गटासाठी सहाय्य (०८) (०१) प्रकल्प व्यवस्थापन आणि प्रकल्प अंमलबजावणी गटासाठी सहाय्य (१०० टक्के केन्द्र हिस्सा) ३१ सहाय्यक अनुदाने २२४५ २६२१ या लेखाशिर्षाअंतर्गत सन २०१९-२० करिता करण्यात आलेल्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३२९ / २०१९ /व्यय-९,दि २२.८.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१११३२३४७२७१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

SHRIRANG SHRIPATI GHOLAP

Digitally signed by SHRIRANG SHRIPATI GHOLAP
DN: c=IN, st=Maharashtra, 2.5.4.20=9a2bc3b45be4b89f7c46c4474cf90b8a3c477e34c064494b04238ca50ee43db6, postalCode=400032, street=1ST FLOOR MAIN ROAD, MANTRALAYA, ou=REVENUE AND FOREST DEPT, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, cn=SHRIRANG SHRIPATI GHOLAP
Date: 2019.09.11 13:37:30 +05'30'

(श्रीरंग घोलप)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत :-

१) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
२) महालेखाकार, महाराष्ट्र -१, मुंबई
३) अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
४) वित्तीय सल्लागार व सह सचिव, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
५) लेखाधिकारी, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मंत्रालय, मुंबई.
६) अर्थसंकल्प शाखा, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
७) निवड नस्ती.